दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र | सोमवार दि.२५ नोव्हेंबर २०२४ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक -९१ | पाने ४ | किंमत ४ रुपये

## शिंदेंसोबत गुवाहाटीला गेलेले ५ आमदार पराभूत

**मुंबई (वृत्तसंस्था)**-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना शिंदे पक्षाचे गुवाहाटीला गेलेले पाच आमदार पराभूत झाले आहेत. दरम्यान, विधानसभा निवडणुकीत शिंदे यांच्यासोबत गुवाहाटीला गेलेले सर्व निवडून आणले नाही, तर राजकारणातून निवृत्ती घेऊ असे म्हणले होते. पराभूत आमदारांमध्ये सदा सरवणकर, यामिनी जाधव, शहाजीबापू पाटील, संजय रायमूलकर आणि ज्ञानराच चौगुले यांचा समावेश आहे.माहीममध्ये सदा सरवणकर यांचा तिरंगी लढतीत पराभव झाला. शहाजीबापू पाटील यांना सांगोल्यात शेतकरी कामगार पक्षाकडून पराभव स्वीकारावा लागला. भायखळ्यातून यामिनी जाधव पराभूत झाल्या. बुलढाण्यातून संजय रायमूलकर यांचा पराभव झाला. उमरग्यामध्ये ज्ञानराज चौगुले यांचा पराभव झाला आहे. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलेले आव्हान खोटे ठरले असल्याचे दिसत आहे.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जून २०२२ मध्ये शिवसेनेत बंडखोरी केली होती. ते शिवसेना आणि अपक्ष असे ५० आमदार सोबत घेऊन बाहेर पडले होते. त्यामुळे उद्धव ठाकरेंचे सरकार पडले होते. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यानंतर भाजपसोबत सत्ता स्थापन केली होती.

### ठाकरे गटाचे पाच आमदार आमच्या संपर्कात

# दोन-तीन सोडता सर्व आमदार आमच्याकडेच येतील ;उदय सामंत यांच्या वक्तव्याने चर्चांना उधाण

**मुंबई (वृत्तसंस्था)**
शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे पाच आमदार आमच्या संपर्कात आहेत. यावेळी दोन-तीन सोडता सर्व आमदार आमच्याकडेच येतील. रात्रीपासून हे आमदार आमच्या संपर्कात आहेत, असे शिवसेना नेते उदय सामंत यांनी म्हटले आहे.दरम्यान उदय सामंत पुढे बोलताना म्हणाले की, ठाकरेंचे काही आमदार आमच्यासंपर्कात् आहेत. त्यांच्याबद्दल एकनाथ शिंदे घेतील. ईव्हीएममध्ये गडबड असल्याचा आरोप आता समोरून केला जातोय. जो धनुष्यबाण दुसऱ्याच्या खांद्यावर होता तो आम्ही घेऊन आलोय. गद्दारी कोणी केली हे पुन्हा एकदा दाखवून दिले.उदय सामंत म्हणाले की, महायुतीचे कोकणमध्ये निवडून आलेले आमदार कोकणचा विकास करू याचा आम्हाला विश्वास आहे. तिथे उदय सामंत यांचे बंधू किरण सामंत हे देखील विजयी झाले आहेत. महाराष्ट्रात महायुतीची सत्ता येणारच होती हे मला माहित होते, असा विश्वास उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. साामंत म्हणाले की. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी केलेली विकासकामं जनतेने पाहिली आहेत. त्यामुळे जनतेचा कौल महायुतीला असल्याचे स्पष्ट झाले आहे.रत्नागिरी विधानसभा मतदार संघात १ लाख ११ हजार ३३५ मते मिळवून उदय रविंद्र सामंत हे विजयी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी जीवन देसाई यांनी घोषित केले. बाळ माने यांना दुसऱ्या क्रमांकाची ६९ हजार ७४५ इतकी मते मिळाली.नारायण राणे यांचे दोन्ही सुपूत्र आमदार म्हणून निवडून आले आहेत. कोकणामध्ये घराण्यांची परंपरा मोठी राजकीय आहे. राणे, तटकरे आणि सामंत यांच्या विजयांच्या रूपाने आता ती अधिकच ठळक होण्यास मदत आहे. सर्वच ठिकाणी यंदा पैशाच्या वारेमाप वापराचा मुद्दा कळीचा राहिला. त्याचा लाभ बहुतांश ठिकाणी प्रस्थापितांना झाल्याचे पाहायला मिळते.



# बीड जिल्ह्यातील सहापैकी ५ जागांवर महायुतीचा झेंडा

## धनंजय मुंडेंचा रेकॉर्डब्रेक विजय

**बीड । प्रतिनिधी**
राज्याचे लक्ष लागलेल्या परळी विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसचे धनंजय मुंडे यांनी सर्वात मोठा विजय मिळवत मतदार संघावर मुडेंचाच बोलबाला असल्याचे सिद्ध करून दाखवले आहे . राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे राजेसाहेब देशमुख यांचा १ लाख ४० हजार २२४ मतांनी दारुण पराभव करत त्यांनी हा विजय मिळवला आहे. शरद पवार यांनी स्वतः लक्ष देऊनहीं धनंजय मुंडे यांचा झालेला रेकॉर्ड ब्रेक विजय मिळवत मुंडेंनी शरद पवारांना मोठा धक्का दिला आहे.
आष्टी विधानसभा मतदारसंघात सुरेश धस यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष महबूब शेख, राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बाळासाहेब आजबे,भाजपाचे बंडखोर भीमराव धोंडे असे तेहेरी आव्हान




असतानाही ७७९७५ ऐवढे मताधिक्य मिळवत दणदणीत विजय मिळवला आहे मिळवला आहे.तर गेवराई विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे पंडित यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे बदामराव पंडित आणि लक्ष्मण पवार यांचा पराभव करत ४२३९० मतांचे मताधिक्य मिळवले आहे. माजलगाव विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रकाश सोळंके यांना आपला गड राखण्यात यश आले आहे त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार मोहन जगताप यांचा ५८९९ मताधिक्यांनी पराभव केला आहे. केज विधानसभा मतदारसंघाच्या भाजपाच्या उमेदवार नमिता मुंदडा अटीतटीच्या लढाईत निसटचा विजय मिळवत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे सुरज साठे यांचा २६८७ मतांनी पराजय केला.
बीड जिल्ह्यात महाविकास आघाडीला फक्त एकच जागा राखता आली ती म्हणजे बीडची या ठिकाणी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे संदीप क्षीरसागर यांनी चुलत भाऊ योगेश क्षीरसागर यांचा ६८८१ मतांनी पराभव करत आपली आमदारकी कायम राखली आहे. योगेश क्षीरसागर यांना जयदत्त क्षीरसागर यांची साथ भेटून देखील संदीप क्षीरसागर यांचा झालेला विजय त्यांच्यासाठी महत्वाचा मानला जात आहे.

# सिल्लोडमध्ये राडा;मतमोजणी केंद्रावर गोंधळ,पोलिसांचा सौम्य लाठीचार्ज,कलेक्टर रवाना

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**
सिल्लोड मध्ये सौम्य लाठीचार्ज मतमोजणी केंद्रावर गोंधळ पोलिसांचा सौम्य लाठीचार्ज कलेक्टर रवाना
सिल्लोड : विधानसभा
मतदारसंघाच्या निकालावरून अफवा पसरल्याने मतमोजणी केंद्राच्या बाहेरील जमाव अनियंत्रित झाला. मतमोजणी देखील काही काळ बंद करण्यात आली, त्यानंतर सत्तार की बनकर यांच्यात कोण विजयी झाले याबाबत माहिती मिळत नसल्याने अचानक परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याने पोलिसानी सौम्य लाठीचार्ज करत जमाव पांगवला. मतदारसंघात कलम १४४ लागू करण्यात आले असून स्वतः जिल्हाधिकारी दिलीप स्वामी सिल्लोडकडे रवाना झाले आहेत.निवडणूक निकालाच्या बाबतीत सोशल मीडियावरून अफवा पसरल्याने मतमोजणी केंद्रा भोवती मोठा जमाव जमला. त्यांनी गोंधळ घातला पोलिसांवर दगडफेक केली. पोलिसांनी बळाचा वापर करून लाठीचार्ज करत जमाव पांगवला. माजी उपनगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी जमावाला शांत केले. तणाव व वाद वाढू नये म्हणून निवडणूक विभागाने मतमोजणी काहीकाळ थांबवली.
मतदारसंघात कलम १४४ लागू,



मतदारसंघात २५ व्या फेरीची मतमोजणी प्रक्रिया सुरू असताना बाहेर ठराविक उमेदवार विजयी झाल्याची अफवा पसरली. यामुळे जमावाने एकच जल्लोष सुरू झाला. मात्र, काहीनी अद्याप मतमोजणी सुरू असल्याचे सांगितल्याने अफवांचे पेव फुटले. त्यानंतर मतमोजणी केंद्राबाहेर मोठा जमाव जमला. परिस्थिती नियंत्रणासाठी सिल्लोडमध्ये पोलिसांचा मोठा फौज फाटा तैनात करण्यात आला आहे.

# परतूर विधानसभा मतदार संघातून बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) विजयी



**जालना । असलम कुरेशी**
विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी ९९-परतूर मतदार संघाची मतमोजणी प्रक्रिया आज येथील जवाहर नवोदय विद्यालय, अंबा ता. परतुर येथे पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी मतदारसंघाचा निवडणूक निकाल जाहीर केला. ९९-परतूर विधानसभा मतदारसंघातून भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना ७०,६५९ मते मिळाली. शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उमेदवार आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील) यांना ६५,९१९ इतकी मते मिळाली. यात भारतीय जनता पक्षाचे उमेदवार बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) हे ४,७४० मतांनी विजयी झाल्याचे घोषीत करुन निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड यांनी बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) यांना निवडणूक प्रमाणपत्र देवून त्यांचे अभिनंदन केले. यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी पदमाकर गायकवाड, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा गोरे यांची उपस्थिती होती.
९९-परतूर विधानसभा मतदारसंघातून एकुण ११ उमेदवार निवडणूकीत सहभागी झाले होते. या सर्व उमेदवारांना पुलील प्रमाणे मते प्राप्त झाली आहेत.
अहेमद महमद शेख बहुजन समाज पार्टी ६९२, आसाराम जिजाभाऊ बोराडे (ए.जे.पाटील) शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) ६५९१९, बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) भारतीय जनता पार्टी ७०६५९, आसाराम सखाराम राठोड (पीपल्स पार्टी ऑफ इंडीया डे.) १२७९, कृष्णा त्रिबंकराव पवार (ऑल इंडीया हिंदुस्थान काँग्रेस पार्टी) १०४५, जाधव श्रीराम बन्सीलाल (जय सेवालाल बहुजन विकास पार्टी) ८०२, रामप्रसाद किसनराव थोरात वंचित बहुजन आघाडी (२९८१०), अग्रवाल मोहनकुमार हरिप्रसाद अपक्ष (१६३३), अजहर युनुस शेख (अपक्ष) ८१२, जेथलिया सुरेशकुमार कन्हैयालाल (अपक्ष) ५३९२१, नामदेव हरदास चव्हाण (अपक्ष) ९९७, नोटा-११६३.

# राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार;पीएम मोदींची पहिली प्रतिक्रिया,महाराष्ट्राला दिलं मोठं आश्वासन

विधानसभा निवडणुकीचा निकाल अखेर हाती आला आहे. लोकसभा निवडणुकीत फटका बसलेल्या महायुतीने विधानसभा निवडणुकीत मात्र जोरदार मुसंडी मारली आहे. महायुतीला महाराष्ट्रात स्पष्ट बहुमत मिळालं आहे.
तब्बल २३० विधानसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार विजयी झाले आहेत. १३२ जागांसह भाजप हा सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर शिवसेना शिंदे गटाला ५७ जागा मिळाल्या आहेत. राष्ट्रवादी अजित पवार गटाला ४१ जागांवर विजय मिळाला आहे. मात्र दुसरीकडे महाविकास आघाडीचा राज्यात मोठा पराभव झाला आहे. मविआला केवळ ४५ जागाच मिळाल्या आहेत. या ऐतिहासिक विजयावर आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी महाराष्ट्रातील जनतेचे आभार मानले आहेत.



**काय म्हणाले पंतप्रधान नरेंद्र मोदी?**
आज महाराष्ट्रात विकासवादाचा विजय झाला आहे. आज महाराष्ट्रात सुशासनाचा विजय झाला आहे. महाराष्ट्रात खऱ्या सामाजिक न्यायाचा विजय झाला आहे. आज महाराष्ट्रात खोटेपणा, धोका यांचा अत्यंत वाईटपद्धतीने पराभव झाला आहे. ज्यांनी विभाजनाचा प्रयत्न केला ते आज हारले. महाराष्ट्रात नकारात्मक राजकारणाचा पराभव झाला आहे. महाराष्ट्राने विकसीत भारताच्या संकल्पाला आणखी मजबूत केलं आहे. आज मी भाजप आणि एनडीएच्या सर्व कार्यकर्त्यांचं अभिनंदन करतो, त्यांना या ऐतिहासिक विजयाच्या शुभेच्छा देतो. मी एकनाथ शिंदे आमचे परममित्र देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचं कौतुक करतो असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.
दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचं नाव न घेता त्यांना जोरदार टोला लगावला आहे. मध्यंतरी काही लोकांनी आम्हाला धोका दिला, राज्यात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मात्र महाराष्ट्राने त्यांना आज उत्तर दिलं आहे. मित्रांनो आज देशाच्या अनेक राज्यातील पोटनिवडणुकीचे देखील निकाल लागले आहेत लोकसभेत आमचं आणखी एक सीट वाढलं आहे. उत्तर प्रदेश, उत्तराखंड आणि राजस्थानने भाजपला खूप सपोर्ट केला आहे. आसामने पुन्हा एकदा भाजपावर विश्वास दाखवला आहे. मध्य प्रदेशमध्ये देखील आम्हाला यश मिळालं आहे. बिहारमध्ये देखील आमचं समर्थन वाढलं आहे. यावरून एक लक्षात येतं की देशाला आता फक्त विकास पाहिजे. मी महाराष्ट्रातील जनतेचे, मात भगिनींचे आणि शेतकऱ्यांचे आभार मानतो. महाराष्ट्र आता विकासाच्या वाटेवर अधिक वेगानं धावेल असं अश्वासन यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे.

# सोनीजवळा गावकऱ्यांनी दळणवळणासाठी पाणी टाकीच्या रस्त्याचा वापर करावा:कर्तव्यदक्ष सरपंच सौ जान्हवी ससाणे

**केज । प्रतिनिधी**
केज ते सोनीजवळा रस्त्यावर बऱ्याच दिवसापासून पाणी साचले होते त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होत असल्यामुळे सोनीजवळा गावच्या कर्तव्यदक्ष सरपंच सौ.जान्हवी ससाणे यांनी जातीने लक्ष घालून व वेळोवेळी प्रशासनाकडे पाठपुरावा करून रस्त्याच्या कामाचा प्रश्न अखेर मार्गी लावला व कामाला प्रत्यक्ष आज सुरुवात झालेली आहे .त्यामुळे सोनीजवळा ,गाव रोडवरील सर्व गावकरी समाधान व्यक्त करत आहेत. तसेच येण्या-जाण्यासाठी म्हणून उद्या रात्रीपर्यंत हा रस्ता बंद राहील पर्यायी रस्ता म्हणून पाण्याच्या टाकीकडील रस्त्याचा वापर करावा असे आव्हान कर्तव्यदक्ष सरपंच सौ. जान्हवी ससाणे यांनी गावकऱ्यांना केले आहे.



संपादकीय

# जेव्हा स्मार्टफोन गहाळ होतो...



सतत हाताशी असणारा स्मार्टफोन दुर्दैवाने चोरीला गेला किंवा हरवला तर पावलोपावली अडून बसते. बँकिंग, इलेक्ट्रोनिक वॉलेट, ऑनलाइन खरेदी अशा सुविधा ठप्प झाल्याने हात बांधल्यासारखे होतात. पोलिस, बँक, टेलिफोन कंपनी इ. ठिकाणी सूचना देणे, नवा फोन घेतल्यावर साऱ्या सुविधा पुन्हा सुरू करणे ही उस्तवार ओघाने आलीच; शिवाय आर्थिक नुकसान व मनस्तापही संभवतो. हे निस्तरण्यासाठी काय करावे याचे दोन टप्पे आहेत. फोन हरवण्याआधीच काही पूर्वतयारी करावी लागते हा आजच्या लेखाचा विषय आहे, तर फोन हरवल्यानंतर नेमके काय करायचे ते पुढच्या लेखात पाहू या.

फोन केव्हा गहाळ होईल हे काही सांगता येत नाही. त्यामुळे काही विशिष्ट तयारी आपण अगोदरच केली पाहिजे. यातलं सर्वांत महत्त्वाचं म्हणजे फोनची सेटिंग्ज आणि काही विशिष्ट ॲप्स. स्मार्टफोनवरचे विविध मेनू व ऑप्शन्स वापरून फोनच्या कार्यप्रणालीत छोटेछोटे बदल करता येतात, त्यालाच फोनची सेटिंग्ज बदलणे म्हणतात. फॅक्टरी सेटिंग्ज म्हटली जाणारी नवीन फोनवरील सुरुवातीची सेटिंग्ज ही बऱ्याचदा सुरक्षेपेक्षा सोयीला प्राधान्य देणारी असतात. सुरक्षेच्या मजबूतीसाठी काही सेटिंग्ज आपणच करायला हवी. विविध ॲप्सची अगणित सेटिंग्ज आहेत, उदाहरण म्हणून एकच आपण इथे पाहू या.

व्हॉट्सॲपच्या या सेटिंगसाठी मेनू अशा क्रमाने वापरता येतील : (१) सेटिंग, (२) अकाउंट व (३) टु स्टेप ऑथेंटिकेशन. त्यानंतर 'एनेबल' हा पर्याय घेतला की पिन सेट करण्याची सूचना येईल. तिथे आपल्या पसंतीची सहा-आकडी संख्या नोंदवली की त्यानंतर व्हॉट्सॲपचा वापर करताना अधूनमधून त्या पिनची विचारणा होईल. आपल्याला तो पिन माहिती असल्याने आपण तो नंबर टाइप करून पुढे जाऊ. पण, फोन चोरीला गेला, तर चोराला हा पिन माहिती नसल्याने आपले व्हॉट्सॲपवरचे संदेश चोराच्या हाती लागण्याची शक्यता कमी होईल. सेटिंग्ज, ॲप्स आणि इतर मार्गाने आपण पुढीलप्रमाणे पूर्वतयारी करून ठेवायला हवी.आपल्याला टेलिफोन सेवा देणारी जी कंपनी असेल (उदा. जिओ, एअरटेल) त्या कंपनीचे ॲप वापरून आपल्या फोनला पर्याय (अल्टरनेट फोन नंबर म्हणून घरातील एखाद्याचा फोन नंबर त्या कंपनीकडे नोंदवून ठेवावा. आपला फोन गहाळ होताच त्यातील सिमकार्ड बंद करण्याची सूचना यथाशीघ्र टेलिफोन कंपनीला देण्यासाठी तो पर्यायी फोन उपयोगी पडतो. अर्थातच ते ॲप पर्यायी फोनवरही असले पाहिजे. हे ॲप नसेल, तर समक्ष जाऊन वा ई-मेल वापरून हेच काम करण्यात जितकी दिरंगाई होईल, तितकी सिमकार्डच्या गैरवापराचा जोखीम वाढत जाईल. फोनद्वारा आपण अनेक सुखसोयी घेतो, उदा. ऑनलाइन बँकिंग, घरपोच किराणा वा खाद्यपदार्थ, इलेक्ट्रोनिक वॉलेट, टॅक्सी बुकिंग, वगैरे. त्या प्रत्येकाच्या ग्राहक केंद्राचे फोन व ई-मेल; तसेच त्या त्या कंपनीने आपल्याला दिलेला ग्राहक क्रमांक हे सारे लिहून (आपल्या फोनवर नव्हे, तर पर्यायी फोनवर किंवा कागदावर) हाताशी ठेवले पाहिजे. प्रत्येक फोनला म्हणजेच हँडसेटला 'आयएमईआय' म्हटला जाणारा एक विशिष्ट नंबर असतो. एखादा फोन नंबर डायल करावा तसे *०६ (स्टार, हॅश, शून्य, सहा, हॅश) ही पाच बटणे दाबली की आपल्या फोनचा 'आयएमईआय' नंबर दिसतो. तोही कुठेतरी लिहून हाताशी ठेवायला हवा. फोनच्या भरभक्कम किमती पाहता फोनचा विमा उतरवण्याचाही विचार अवश्य करावा. हरवलेल्या फोनऐवजी नवीन फोन घेणे, अपघाताने मोडतोड झाल्यास फोनची दुरुस्ती करणे इ. खर्चांची तरतूद अशा पॉलिसीद्वारे करता येईल. विमा कंपनीला वा पोलिसांना फोन हरवल्याची सूचना देण्यासाठी फोन खरेदीची पावती लागू शकते, तीही हाताशी असावी. आपला फोन जर हरवला, तर दुसरा एखादा फोन वापरून काही उपाय दूरस्थपणे योजता येतात. उदा. हरवलेला फोन सध्या कुठे आहे ती जागा हुडकून काढणे, तो लॉक करून त्याचा गैरवापर रोखणे, त्यावरील माहितीचा दुरुपयोग टाळण्यासाठी ती डिलिट करणे वगैरे. मात्र, त्यासाठी आपला फोन हाताशी आहे तोवरच या सुविधा कार्यरत (ॲक्टिव्हेट) करून ठेवायला हव्या. फोन यदाकदाचित गहाळ झालाच, तर या पूर्वतयारीच्या जोरावर पुढची कार्यवाही झटपट करता येईल. त्याची माहिती आगामी लेखात घेऊ या.

# कोणीही संपू देत, आम्ही राहणारच!

आदरणीय मशालप्रमुखांनी 'एक तर तुम्ही राहाल किंवा मी राहीन, तुम्हाला बघून घेईन,' असे ज्या आवेशाने म्हटले, ज्या त्वेषाने म्हटले त्यातून 'बघून घेण्या'च्या भारतीय संस्कृतीचाच पुनरुच्चार झाला. यात काहींना राजकारणाची पातळी वगैरे घसरल्याचा साक्षात्कार होईल, परंतु तसे अजिबातच नाही. आपण भारतीय एकमेकांना 'बघून घेण्यात' पटाईतच आहोत. कोणीच कोणाला बघून घेण्याची एकही संधी सोडत नाही, त्यालाच तर भारतात 'एकात्मिक विकास' असं म्हणतात. साधा ऑफिसातला शिपाईसुद्धा त्याच्या साहेबाला 'बघून घेत' असतो. साहेबानं जर म्हटलं की पाणी घेऊन ये, तर तो बराचवेळ टाइमपास करून, साहेबाचा घसा जोवर कोरडा पडत नाही तोवर पाणी घेऊन जात नाही. 'एवढा वेळ का केलास?' असं साहेबांनी आवाज चढवून समजा विचारलंच तर, ऑफिसात किती काम आहे, मी एकटाच काय काय करू, असं गाऱ्हाणं लावतो. साहेब बिचारा 'ठिक आहे' म्हणून फुटवतो, कारण सगळी कारणं खरीच असतात. शिपाई गालातल्या गालात हसत मनातल्या मनात म्हणतो, 'मला ओरडतोस का लेका? बघूनच घेतो तुला.''बघून घेतो'चा हा अनुभव आपल्या समाजात अगदी शालेय पातळीपासून येतो. एकेकाळी शाळेत ढ विद्यार्थी हा शिक्षकांसाठी आव्हान असे, आता तो संधी असतो. लगेचच शिक्षक संबंधित पाल्याच्या पालकाला निरोप पाठवतो, 'तुमचा पाल्य अमूक तमूक विषयात कच्चा आहे, त्याला माझी शिकवणी लावा.' शिक्षकानं बायकोला आधीच सांगितलेलं असतं, दहा मुलं कच्ची आहेत आणि दहा मुलं पक्की असूनही त्यांच्या पालकांना शिकवणी हवी आहे. वीस मुलांचे मिळून महिना दहा हजार रुपये येतील. बायकाने त्या दहा हजारांच्या खर्चाचा हिशेब करून ठेवलेला असतो. अशा वेळी शिक्षकानं हिशेबात धरलेल्या विसातली तीन-चार मुलं कमी झाली तर गृहित धरलेल्या उत्पन्नात खड्डा पडतो. शिक्षक म्हणतो, 'या चौघा मुलांना मी आता बघूनच घेतो'. मग तो वर्गात त्यांनाच जास्त प्रश्न विचारतो. 'बघतोच कसे पास होतात ते? पाहतोच यांची प्रगती कशी होते ते?' असे म्हणत राहतो.तिनं त्याला किंवा त्यानं तिला नकार देणं हे काही आपल्या समाजात नवीन नाही. बहुधा तीच त्याला नकार देते, कारण तोच तिला विचारत असतो. मध्यमवर्गीय मराठी मुलंही एकेकाळी नकार मिळाल्यावर फार तर चार दोन कविता करायची आणि गप्प बसायची. जरा पुढारलेली असतील, खिशात पैसे असतील तर मित्रासमोर मन मोकळं करून दोघांत एक बीअर प्यायची, पण आता समाज प्रगत होतो आहे. 'बघून घेऊ'ची व्याख्या बदलत आहे. कधी तेजाब मिळतं फेकायला, कधी शरीरातली रग बाहेर काढली जाते, कधी हाती शस्त्र सापडतं. प्रगती प्रगती म्हणतात ती काय केवळ विज्ञान आणि तंत्रज्ञानात असते की काय?नवरा बायकोत तर काय 'बघून घेऊ'चा खेळ नेहमीच खेळला जात असतो. नवऱ्याचे नातेवाईक जेवायला आले असतील तर नेमकं भाजीत मीठ जास्त पडतं किंवा कूकर असूनही भात करपतो. सासू-सूनेच्या विसंवादात नवऱ्यानं त्याच्या आईची बाजू घेऊन तर पहावं? नेमकी शनिवारच्या रात्रीच बायकोला लवकर झोप येऊ लागते की नाही ते पाहा! त्यानं घरी आल्या आल्या 'चल जाऊ या बाहेर दोघे जेवायला', असं विचारल्यावर ती म्हणणार, 'सकाळचं उरलेलं कोण खाणार? तुमच्या आईला तर शिळं खाल्लं की त्रास होतो.' मग तो चूपचाप हातपाय धुवायला जातो. रात्री तो एका कुशीवर झोपून गेल्यावर मात्र त्याच्याकडे पाहात ती मनातल्या मनात म्हणणार, ' घ्या ना आणखी आईंची बाजू, बघूनच घेते मी!'अगदी छोट्या छोट्या व्यवहारातही हे 'बघून घेणं' उमटत असतं. आयुष्यभर नवऱ्याचा त्रास सहन कराव्या लागलेल्या आणि काही बोलू न शकणाऱ्या स्त्रिया म्हातारपणी आलेलं दहा टक्के बहिरेपण स्वतःच नव्वद टक्क्यांपर्यंत वाढवतात आणि जरा वेगळ्या पद्धतीनं नवऱ्याला 'बघून घेतात'. भाजीवालीशी दहा-पाच पैशांसाठी घासाघीस करणाऱ्या बाईला 'बघून घेण्यासाठी' भाजीवाली संधी मिळताच एक वांगं किंवा कोथिंबिरीची एखादी काडी कमी घालते. इलेक्ट्रिशियन मुळात चारदा बोलावल्याशिवाय येतच नाहीत. आल्यावर जर पैसे ठरवताना काचकूच केली तर तो दोन बटनांचे बिल आणताना ते फुगवून आणतो आणि आपल्याला 'बघून घेतो'.'बघून घेऊ', 'बघून घेईन', 'पाहून घेईन' वगैरेची भाषा ही आपल्या महान संस्कृतीचाच एक भाग आहे. 'तुम्हाला बघतोच आता' हे वाक्य नसतं तर रामायण घडलं नसतं, महाभारत घडलं नसतं आणि हिंदवी स्वराज्याची स्थापनाही झाली नसती. त्यामुळे मशाल प्रमुखांनी एखाद्याला 'तुम्हाला आता पाहूनच घेतो' असं म्हटलं असेल तर ते आपल्या संस्कृतीच्या बाहेरचं अजिबात नाही. अमूक पदावरील व्यक्तीच्या तोंडी अशी भाषा शोभत नाही वगैरे काही लोक म्हणत असतात. त्यांच्याकडे तूर्तास दुर्लक्ष करून वेळ येईल तेव्हा त्यांनाही बघून घेता येईल. तेव्हा खुशाल बघून घ्या, एकतर तुम्ही राहाल किंवा ते राहतील, एक तर ते संपतील किंवा तुम्ही संपाल, परंतु, कोणीही संपलं तरी आम्ही राहणारच आहोत. कारण आम्ही जनता जनार्दन, मतदार राजा वगैरे वगैरे आहोत.

# स्पर्धा परीक्षांची दुकानं

दिल्लीतल्या ओल्ड राजेंद्र नगर भागातील एका कोचिंग सेंटरच्या बेसमेंटमध्ये पावसाचं आणि फुटलेल्या गटाराचं पाणी भरून झालेल्या दुर्घटनेत तीन तरुण मुलांचा मृत्यू झाला. या विषयीच्या बातम्या, त्यावर वेगवेगळ्या व्यासपीठांवर चालू असलेला गदारोळ, सरकारची कारवाई, राज्यकर्त्यांची तात्पुरती मलमपट्टी या सर्वांच्या पलीकडे जाऊन माझ्या मनावर जे चित्र सतत उमटत राहतं, ते त्या तीन तरुण मुलांची छायाचित्रे आणि त्या संपूर्ण परिसरात निदर्शनं करणारे तरुण-तरुणी. मी दिल्लीत राहते. ही मुलं ज्या स्पर्धा परीक्षांची तयारी करत होती, ती परीक्षा मी दिली आहे आणि याच राजेंद्र नगर भागात अगदी थोड्या काळासाठी का होईना, पण मी २३ वर्षांपूर्वी राहिले आहे; म्हणूनही या घटनेच्या निमित्ताने काही मुद्द्यांवर आपण समाज म्हणून विचार केला पाहिजे, असं मला वाटतं.

ओल्ड राजेंद्र नगर, मुखर्जी नगर, कटवारीया सराय ही यूपीएससीची नागरी सेवा परीक्षांची मोठी केंद्रं आहेत. 'केंद्र' या शब्दामुळे एखादी इमारत, असं कोणाच्या डोळ्यासमोर येत असेल तर तो गैरसमज आहे. ओल्ड राजेंद्र नगरमध्ये कोचिंग क्लासेस आहेत, त्यांच्या अभ्यासिका आहेत, स्पर्धा परीक्षांची पुस्तकं - नोट्स पुरवणारी दुकानं आहेत, कोचिंगला येणाऱ्या मुलांची राहण्याची व्यवस्था असणाऱ्या अनेक इमारती आहेत, या इमारतींमधून राहणाऱ्या मुलांना टिफिन पुरवणारी मंडळी आहेत, या घरांमधून सफाई इत्यादी काम करणारे हेल्पर्स आहेत, कोचिंग-निवास-खानपान असं पॅकेज मिळवून देणारे दलाल आहेत, वेगवेगळे क्युझिन पुरवणारे फूड जॉइंट्स आहेत. ही एक वेगळीच दुनिया आहे, जिथे स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी होऊन आयएएस किंवा आयपीएस होण्याची स्वप्नं पाहिली जातात आणि ती स्वप्नं इथे विकली पण जातात. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात, बेरोजगारी किंवा नोकरी-व्यवसायाच्या मर्यादित संधी, हा गंभीर प्रश्न आहे. रोजगाराच्या संधी लोकसंख्येच्या प्रमाणात वाढत नाहीत. खासगी क्षेत्रातल्या नोकऱ्यांमध्ये सरकारी नोकऱ्यांसारखी सुरक्षितता नाही, समाज म्हणून आजही आपल्याला जिल्हाधिकारी-एसपी यांचं वाटणारं आकर्षण या सगळ्या घटकांमुळे स्पर्धा परीक्षा देण्याकडे विद्यार्थ्यांचा कल वाढलेला आहे. आता स्पर्धा परीक्षा म्हटल्यावर चुरशीची लढाई आली, ती लढाई जिंकण्यासाठी लागणारी मेहनत आली. अर्थशास्त्रात एक तत्त्व आहे, मागणी तसा पुरवठा. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी कोचिंग क्लासेस सुरू झाले. या क्लासेससाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून मुलं यायला लागली. मग त्या मुलांच्या राहण्याच्या, खाण्यापिण्याच्या गरजा भागवण्याची गरज निर्माण झाली. या सगळ्या सेवा एकाच ठिकाणी मिळाल्या तर विद्यार्थ्यांची मोठीच सोय झाली म्हणायची. या सगळ्या सेवा पटापट पुरवण्यामागे मोठी आर्थिक गणितं आहेत, हे कोणालाही सहजच कळेल. ज्या झपाट्यानं या सेवांची मागणी वाढली, त्या झपाट्यानं सेवा पुरवणं - आणि त्याही सर्व नियम पाळून पुरवणं - शक्यच नव्हतं. मग बेसमेंटमध्ये लायब्ररी करा, बंगला पाडून बिल्डिंग बांधा, नियम धाब्यावर बसवून खाण्यापिण्याच्या गाड्या लावा, हे प्रकार सुरू झाले. सन २००१मध्ये मी जेव्हा ओल्ड राजेंद्र नगरमध्ये राहत होते, तेव्हा तिथे अनेक टुमदार बंगले होते. इथल्या बंगल्यांच्या मालकांनी तळमजल्यावरच्या खोल्या मुलांना भाड्याने द्यायच्या आणि वरच्या मजल्यावर आपण राहायचं, अशी सुरुवात केली होती; पण यथावकाश यातले बरेच बंगले पाडले गेले आणि वेगानं इमारती उभ्या राहिल्या. या सगळ्या सेवा उपलब्ध झाल्यावर कोचिंग क्लासेस भरभरून चालणार होते. त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन या सेवा-सुविधा पुरवायचे प्रयत्न केले. हाच या भागाचा अनिर्बंध विकास. गेल्या आठवड्यात झालेली दुर्घटना हा आश्चर्यकारक अशासाठी नाही, कारण अशा आपत्ती ओढवून घेण्याची परिस्थिती इथे अनेक वर्षांपासून होती.सरकारी यंत्रणेत येऊन काम करण्याची, व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणण्याची स्वप्नं उराशी बाळगणाऱ्या आणि त्यासाठी अतोनात मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रयत्नांची सुरुवात अशा अनिर्बंध व्यवस्थेमध्ये व्हावी, यासारखी शोकांतिका नाही. म्युनिसिपल कमिशनर होण्याची स्वप्नं बघणारी एखादी श्रेया यादव परवानगीशिवाय सुरू असलेल्या बेसमेंटमध्ये पाणी भरून मृत्युमुखी पडते, ही समाज म्हणून आपल्याला खडबडून जागे करणारी घटना असायला हवी.या संबंधित अनेक प्रश्न आहेत. स्पर्धा परीक्षा आणि त्यातून मिळणाऱ्या नागरी सेवांमधल्या नोकऱ्या यांचं खूप ग्लोरिफिकेशन होत आहे का? समाजमाध्यमांचा या ग्लोरिफिकेशनमध्ये मोठा वाटा आहे का? रोजगाराच्या इतर आकर्षक संधी नाहीत म्हणून तरुण मुलं या पर्यायाचा विचार करत आहेत का? आर्थिक क्षमता नसतानासुद्धा महागडे कोचिंग क्लासेस मुलांना लावणारे पालक हा मुलगा/मुलगी सेवेत आल्यावर हे सगळे पैसे दामदुपटीने वसूल करेल, असा विचार करतात का? नियम पाळणं ही शिस्त, समाज म्हणून आपण विसरायला लागलो आहोत का? आपल्या डोळ्यांदेखत एखादी चुकीची-बेकायदा गोष्ट होत असेल तर आपण त्याकडे दुर्लक्ष करतो का? हे सगळे कठीण प्रश्न आहेत आणि त्यांची उत्तरं साधी-सरळ-सोपी नाहीत. एका बेसमेंटमध्ये पाणी भरून अपघात झाल्यावर परिसरातल्या सर्व बेसमेंट सेवा बंद करणे, हा काही कायमस्वरूपी उपाय नाही. मुळात, नियमांच्या विरोधात बेसमेंट कसं उभं राहिलं आणि वर्षानुवर्षे चालू कसं राहिलं, हा मुख्य प्रश्न आहे. हे प्रश्न मुळापासून सोडवले गेलं नाहीत तर हाही प्रकार थोडे दिवस चघळून विसरला जाईल. आज ओल्ड राजेंद्र नगरमध्ये आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे आईवडील समजावतील, की 'हे सगळं सोड आणि अभ्यासाला लाग. तुला परीक्षा द्यायची आहे आणि मोठा अधिकारी व्हायचं आहे. कशाला वेळ फुकट घालवायचा? तू स्वतःची काळजी घे आणि अभ्यास कर.' कोचिंग क्लासेसच्या व्यवसायावरच गदा आल्याने तीही मंडळी कामाला लागतील आणि हळूहळू आपला कारभार सुरू करतील. आधी ऑनलाइन क्लास घेतील, मग छोट्या बॅचेस घेतील. बेसमेंट तात्पुरती बंद राहतील, पावसाळा गेला की, पुनःश्च सुरू होतील. सध्याच्या गदारोळात वृत्तवाहिन्या ओल्ड राजेंद्र नगरमध्ये पोहोचतील, तिथली परिस्थिती कशी आहे, याचे नाट्यमय व्हिडीओ, बातम्या दाखवतील. तिथली परिस्थिती कशी गंभीर आहे याबद्दल तावातावाने बोलतील. मुलंही त्यांना भावनेच्या भरात प्रतिसाद देतील. पण या सगळ्यामुळे मूळ प्रश्न सुटेल का? आणखी एखादी घटना घडली, की मीडिया तिथे धावेल. नंतर याच मुलांना आपलं रुटीन चालू ठेवायचं आहे. आईवडिलांनी कोचिंगचे, दिल्लीत राहण्याचे प्रचंड पैसे खर्च केले असतील त्याचा विचार करून परीक्षेची तयारी करायची आहे. मूळ प्रश्न, हजारभर हुद्द्यांसाठी लाखोंनी उमेदवार परीक्षा देतात आणि त्या परीक्षेतलं यश त्यांच्यासाठी इतकं महत्त्वाचं असतं, की त्यासाठी अमाप खर्च करण्याची त्यांची तयारी असते. प्रश्न हा आहे, की डॉक्टर किंवा इंजिनीअर झाल्यावरसुद्धा नागरी सेवेकडे वळावं असं तरुण तरुणींना वाटत आहे. समाजसेवा-व्यवस्थेमध्ये बदल घडवून आणणे, अशी उदात्त ध्येय ठेवून येणारे तरुण किती आणि नोकरीची शाश्वती आहे-मान मरातब आहे- अयोग्य मार्गानं पैसे कमावण्याची संधी आहे, म्हणून येणारे तरुण किती, हेही एकदा शोधलं पाहिजे.आपल्याकडे 'डेमोग्राफिक डिव्हिडंड'बद्दल नेहेमी बोललं जातं. या तरुण लोकसंख्येचे देशाला फायदे हवे असतील तर त्यांना कौशल्यं शिकवली पाहिजेत, त्यांना विविध क्षेत्रांत नोकरी-व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. ज्या प्रमाणात तरुण लोकसंख्या वाढली, त्या प्रमाणात इतर सोयी-सुविधा-संधी-यंत्रणा उभ्या राहिल्या नाहीत, तर ही तरुणाई हिंसेचे मार्ग स्वीकारेल. ओल्ड राजेंद्र नगरमधल्या विद्यार्थ्यांच्या निदर्शनांबद्दलच्या बातम्या पाहत असताना माझ्या एका सहकारी अधिकाऱ्याने नोंदवलेलं निरीक्षण फार महत्त्वाचं आहे. तो म्हणाला, 'या वर्षीची प्रीलिम जी मुलं पास झाली नाहीत ना, तीच मुलं ही निदर्शनं करत आहेत. कारण त्यांना अपयशाने निराशा आली आहे. जी मुलं प्रीलिम परीक्षा पास झाली, त्यांना दोन तीन महिन्यांत मुख्य परीक्षा द्यायची आहे. त्यांना पुढच्या यशाची आशा आहे आणि म्हणून ती अभ्यासाला लागली आहेत.' स्पर्धा परीक्षेची प्रक्रियाच चालते वर्षभर. सर्व टप्प्यांवर यशस्वी होत गेलं, तर वर्ष, पण एखाद्या टप्प्यावर यश नाही आलं तर पूर्ण परीक्षा पुन्हा द्यावी लागते, म्हणजे आणखी एक वर्ष. प्रत्यक्ष परीक्षा देण्याआधी साधारण वर्षभर आधी परीक्षेची तयारी सुरू होते. या काळात अभ्यासाव्यतिरिक्त फार कशाचा विचार करताच येत नाही तरुणांना. परीक्षा किती वेळा देता येईल आणि कुठच्या कॅटेगरीतल्या लोकांना वयाच्या कितव्या वर्षापर्यंत परीक्षा देता येईल, याचेही निकष काही वर्षांपूर्वी अतिशय शिथिल केले गेले. ग्रामीण भागातील मुलांवर अन्याय होऊ नये-मागास समाजातल्या मुलांवर अन्याय होऊ नये, अशा उदात्त हेतूने जरी हे निर्णय घेतले असले तरी याचा एक परिणाम म्हणजे या परीक्षेच्या चक्रात तरुण बरीच वर्ष अडकून पडतात. यात उमेदीचं वय निघून जातं, नोकरीच्या इतर संधी निसटून जातात आणि सर्वांत महत्त्वाचं म्हणजे अपयशामुळे निराशा येते. अशी तरुणाई कुठचा 'डेमोग्राफिक डिव्हिडंड' देणार देशाला?

ओल्ड राजेंद्र नगरमध्ये घडलेल्या दुर्घटनेची मुळं सर्वदूर पसरली आहेत. त्यातून मार्ग काढण्यासाठी अनेक पातळ्यांवर ठोस प्रयत्न होण्याची गरज आहे. ओल्ड राजेंद्र नगरमध्ये कँडल मार्च करणाऱ्या, आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांकडून मला आशा आहे, की यातलेच काही विद्यार्थी भविष्यात प्रामाणिक अधिकारी होतील आणि आपापल्या परीने व्यवस्था ठीक करण्याचे प्रयत्न करतील. काही विद्यार्थी उद्योगधंद्यांकडे वळतील आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत भर घालतील. काही डॉक्टर पुन्हा वैद्यकीय क्षेत्राकडे वळतील आणि रुग्णांची सेवा करतील. अशा तरुणाईला समाज म्हणून आपण किती आधार देतो आणि त्यांच्या कामात सहभागी होतो, ही महत्त्वाची गोष्ट आहे.

# कीटकनाशकांमुळे कर्करोगांचा धोका



आहार हा आरोग्यमय जीवनाचा मूलभूत घटक असतो. आहार नुसता पौष्टिक नाही, तर शुद्धही असावा लागतो. तो ताजा असावा, त्यात जीव-जंतू नसावेत एवढ्यापुरतीच ही शुद्धता मर्यादित नसावी, तर शरीराला हानिकारक ठरू शकणारी रसायने आणि तत्सम अपायकारक पदार्थही त्यात नसणे अपेक्षित असते. याशिवाय आहारातील सर्व अन्नघटक योग्य प्रमाणात मिळणेदेखील आरोग्यासाठी अत्यावश्यक असते. त्यासाठी अन्नपदार्थांचे उत्पादन लोकसंख्येच्या प्रमाणात असावे लागते. संयुक्त राष्ट्र लोकसंख्या विभागाच्या मते सन २०५०पर्यंत जगाची लोकसंख्या ९.७ अब्ज होईल. आजच्या तुलनेत सुमारे ३० टक्क्यांहून अधिक असणारी जागतिक लोकसंख्या विशेषतः विकसनशील देशांमध्ये असेल. संयुक्त राष्ट्रांच्या 'अन्न आणि कृषी संघटने'च्या (एफएओ) मते, विकसनशील देशांमध्ये, लोकसंख्येच्या वाढीशी सुसंगत राहण्यासाठी जगामधील अन्न उत्पादनात ८० टक्के वाढ होणे आवश्यक ठरते. त्यासाठी सध्याच्या शेतजमिनीच्या क्षेत्रात वाढ केल्यास, केवळ २० टक्के अतिरिक्त अन्न उत्पादन होऊ शकेल. अन्नधान्य निर्मितीमध्ये, म्हणजेच शेतीमध्ये कीटक, विषाणू, जीवाणू, बुरशी यांमुळे धान्याचा होणारा नाश हा एक ज्वलंत प्रश्न असतो. त्यासाठी वेगवेगळी कीटकनाशके जगात सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरली जातात. कीटकनाशके ही आधुनिक काळातील शेतीमधली अत्यावश्यक बाब बनली आहेत. मात्र, 'फ्रंटियर्स इन कॅन्सर कंट्रोल अँड सोसायटी' या नामांकित वैद्यकीय नियतकालिकाच्या २५ जुलैच्या अंकात प्रकाशित झालेल्या एका संशोधनामध्ये, सर्वत्र मोठ्या प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांमुळे विविध प्रकारचे कर्करोग उद्भवतात, असे दर्शवले आहे. 'युनायटेड स्टेट्स जिओलॉजिकल सर्व्हे अँड कॅन्सर'द्वारे, सध्या वापरल्या जाणाऱ्या कीटकनाशकांशी संपर्क आल्यामुळे उद्भवू शकणाऱ्या कर्करोगाच्या शक्यतेचे मूल्यांकन करण्यासाठी, अमेरिकेतील काउंटी स्तरीय डेटाचे विश्लेषण केले. त्यामध्ये प्रत्येक क्षेत्रात वापरली जाणारी कीटकनाशके आणि त्यातून उद्भवणारी कर्करोगाची प्रकरणे, यांची सांगड घातली. या संशोधनात असेही म्हटले आहे, की सिगारेट ओढल्यामुळे ज्या प्रमाणात कर्करोग होतात, त्याच प्रमाणात कीटकनाशकांमुळे कर्करोग उद्भवतात.

# अनुराधा चव्हाण यांनी १ लाख ३५ हजार मत घेत ३२ हजार ५०१ मतांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा केला पराभव

## फुलंब्रीच्या पहिल्या आमदार होत चव्हाण यांनी बागडे नानांचा गड अबाधित राखला

## जनतेच्या अभूतपूर्व प्रेमामुळे हा ऐतिहासिक विजय–आमदार अनुराधा चव्हाण

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

फुलंब्री विधानसभा मतदार संघात मी भाजप शिवसेना महायुतीच्या वरिष्ठांनी मला संधी दिली. त्यांच्या आणि कार्यकर्त्यांच्या सहकार्यानेच आज हा ऐतिहासिक विजय खेचून आणण्यात आम्हाला यश मिळाले आहे. विरोधकांनी माझ्यावर आरोप केले. मात्र मतदारसंघातील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवला माझी जात आणि धर्म हा विकास आहे, त्यामुळे मी आतापर्यंत केलेला विकास जनतेसमोर मांडला. फुलंब्री मतदारसंघाला विकसित करण्यासाठी माझ्याकडे असलेल्या व्हिजनला जनतेने स्वीकारले आहे. आता माझी जबाबदारी वाढली असून महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांच्या मतदार संघातील विकासाच्या रथाला पुढे घेऊन जायचे आहे, असे मत फुलंब्री विधानसभेच्या नवनियुक्त पहिल्या महिला आमदार अनुराधा अतुल चव्हाण यांनी शनिवारी (दि. २३) रोजी व्यक्त केले. त्यांनी १ लाख ३५ हजार मत घेत ३२ हजार ५०१ मतांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव केला आहे.

यावेळी बोलताना अनुराधा चव्हाण म्हणाला की, या मातीतील माणसांनी विकासासाठी आणि कल्याणासाठी मला मतदान रुपी आशीर्वाद दिले. मी फुलंब्री मतदार संघातील जनतेला शब्द देते की, मी माझे आयुष्य मतदारसंघातील विकासासाठी समर्पित केले आहे.





इथल्या विकासाच्या प्रत्येक विटेमध्ये आणि इथल्या माणसाच्या सुख-दुःखामध्ये मी कायम वाटेकरी आहे आणि सदैव राहील. त्यामुळे गाव खेड्यातून मला भरभरून मतदान रुपी आशीर्वाद मिळाले असून येत्या पाच वर्षात मतदार संघातील जनतेची सेवा करून कायम त्यांच्या ऋणात राहणार असल्याचे मत अनुराधा चव्हाण यांनी व्यक्त केले.

**निवडणूक जनतेने हाती घेतली :**

गेल्या दहा-बारा वर्षांपासून राजकारणात सक्रिय असल्यामुळे मतदार संघातील गाव खेड्यातील शेवटच्या घटकापर्यंत विविध पदावरती काम करत असताना विकासाची गंगा प्रत्येकाच्या दारापर्यंत पोहोचवण्यासाठी मी कायम प्रयत्न केले आणि निरंतर करत राहील. याच कामाची पावती म्हणून माझी निवडणूक पक्षातील सर्व लाडक्या भावांनी, बहिणींनी आणि सर्वसामान्य जनतेने हातात घेऊन विजयी केले. मतदारसंघातील जनतेने मतदान रुपी आशीर्वाद देऊन विधानसभेत पाठवले असून विकासाची गंगा तैवत ठेवण्याच्या विश्वासाला मी कधीच तडा जाऊ देणार नाही. असा निर्धार अनुराधा चव्हाण यांनी यावेळी व्यक्त केला.

**राज्यपाल बागडे नानांची उत्तराधिकारी अनुराधा चव्हाण :**

फुलंब्री विधानसभा मतदारसंघात मोठ्या प्रमाणात इच्छुक होते. मात्र भाजप पक्षश्रेष्ठींनी आणि महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे नानांनी आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी चव्हाण यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना उमेदवारी दिली. त्यामुळे नाराजांची समजूत काढत त्यांना सक्रिय करून घेण्यात चव्हाण यांना यश आले आहे. यामुळेच त्यांनी भाजपचा गड कायम राखत बागडे नानांचा उत्तराधिकारी होण्याचा बहुमान पटकावल्याची चर्चा आहे.

### गोवा येथील २४ व्या आंतरराष्टीय कराटे स्पर्धेत

# नगरच्या वल्ड फुनाकोशीच्या खेळाडूंनी मिळवले उत्तुंग यश

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

गोवा येथे नुकतीच २४ वी आंतरराष्टीय कराटे चॅम्पियनशिप स्पर्धा संपन्न झाली यामध्ये नगरच्या वल्ड फुनाकोशी संस्थेच्या कराटेपटूंनी विविध पदके मिळवली .या स्पर्धेत नगरच्या २० कराटे खेळाडूंनी सहभाग घेतला त्यापैकी १७ खेळाडूंनी यश प्राप्त केले व विविध पदके पटकाविली .विविध वयोगटात ,विभागात या स्पर्धा संपन्न झाल्या .या स्पर्धामध्ये परदेशातील यूएसए ,पोर्तुगाल ,इटली , केनिया ,दक्षिण आफ्रिका ,स्वीडन ,नेपाळ ,केनडा,ऑस्ट्रलिया , आयरलँड आदी देशातील तथा भारतातील विविध राज्यातील स्पर्धक सहभागी झाले होते .गोवा येथे फुनाकोशी शोतोकान कराटे असोसिएशन च्या वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते .

यावेळी बोलताना मुख्य प्रशिक्षक हारून शेख म्हणाले कि गोवा येथील स्पर्धेमध्ये विविध देशातील असंख्य कराटे खेळाडू सहभागी झाले होते . त्यामध्ये आपल्या संस्थेच्या कराटे खेळाडूंनी भाग घेऊन चांगले यश संपादन केले खेळाडूंनी आपल्या मेहनत ,जिद्द,चिकाटी च्या जोरावर चांगले यश मिळवले विविध देशातील खेळाडूंशी झुंज देत मिळवलेले पदके अभिमानास्पद आहे . या खेळाडूंच्या यशाने इतर खेळाडूंना प्रोत्साहन मिळणार असल्याचे सांगितले . स्पर्धेतील



यश संपादन करणारे खेळाडू खालीलप्रमाणे वयोगट १० ते ११ मधील सुवर्णपदक विजेते – पार्थ चतारे , अनन्या रासकर ,आहना भंडारी ,ज्ञानेश दारूडे , बुऱ्हानुद्दीन हकीमजीवाला ,मुसफिरा शेख , रप्य पदक विजेते खेळाडू – पार्थ चतारे , बुऱ्हानुद्दीन हकिमजीवाला , कास्य पदक विजेते खालीलप्रमाणे – अनन्या रासकर, बुऱ्हानुद्दीन लतीफजीवाला ,आहना भंडारी , ज्ञानेश दारुडे , मुसाफिरा शेख , वयोगट १२ ते १३ मधील सुर्वपदक विजेते – शौर्य बल्लाळ ,अशकांन शहा रप्य पदक विजेते– अशकान शहा वयोगट १४ ते १५ मधील सुवर्णपदक विजेते – अक्षरा रासकर , तीरतेषा गुगळे ,इशान होशिंग ,आदित्य बोरा ,कस्तुरी नरावडे रप्य पदक विजेते – अक्षरा रासकर , तीरतेषा गुगळे,इशान होशिंग ,सिद्धी कोरडे , कास्य पदक विजेते – कस्तुरी नरावडे नेतिक कंठाळी वयोगट १६ ते १७ मधील स्वराज नारायण यांना रप्य पदक मिळाले तर दीपाली भालेराव यांना गुड टीम वर्क म्हणून सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला . या सर्व कराटे खेळाडूंना मुख्य प्रशिक्षक हारून शेख ,प्रशिक्षक रमजान शेख , दीपाली भालेराव ,तन्वीर शेख ,बिलाल शेख यांचे मार्गदर्शन लाभले तसेच या स्पर्धेच्या वेळी चित्रपट अभिनेते सुमन तलवार उपस्थित होते ते चांगले कराटे खेळाडू सुद्धा आहेत , तसेच अमेरिका येथून ग्रँड मास्टर केविन फुनाकोशी उपस्थित होते ते केनेथ फुनाकोशी यांचे चिरंजीव आहे केनेथ फुना कोशी जे शोतोकान कराटे चे संस्थापक असून त्यांनी संपूर्ण आंतरराष्टीय देशात कराटे चे प्रशिक्षण दिले आहे सर्व विजेते खेळाडूंचे अभिनंदन होत आहे.

# मतदारनगरीचे वेबपेज मतदारांसाठी उपयुक्त–आशिष येरेकर

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या माध्यमातून मतदान निवडणूक प्रक्रिया निरंतर चालू आहे.लोकशाहीचे महत्त्व वारंवार अधोरेखित करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मतदार जागृती मंच असलेल्या मतदारनगरी सारखा उपक्रम फार महत्त्वाचा ठरला आहे.महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अधिकारी-कर्मचाऱ्यांबरोबरच अभ्यागतांना देखील लोकशाही शिक्षणाची ही फार मोठी पर्वणी ठरू शकते.मतदारनगरी कक्ष हा मतदार जनजागृतीतील इतिहास ठरू शकतो.जे नागरिक मतदारनगरीचा अनुभव घेऊ शकत नाही त्यांच्यासाठी मतदारनगरीचे वेबपेज उपयुक्त आहे.असे प्रतिपादन आशिष येरेकर (मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अहिल्यानगर) यांनी केले.

,श्री सिद्धाराम सालीमठ जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या निर्देशानुसार श्री भास्कर पाटील (अध्यक्ष-मतदार जागृती मंच तथा शिक्षणाधिकारी) यांच्या संकल्पनेतून तयार केलेल्या मतदारनगरीच्या मतदार जागृती मंच,जिल्हा परिषद अहिल्यानगर या शीर्षकाच्या वेबपेजच्या विमोचनप्रसंगी श्री येरेकर बोलत होते.यावेळी यशवंत डांगे(आयुक्त तथा प्रशासक-मनपा),अशोक कडूस (स्वीप नोडल अधिकारी तथा शिक्षणाधिकारी),प्रशांत खांडकेकर(जिल्हा




सहआयुक्त - नपा प्रशासन),बाळासाहेब बुगे (शिक्षणाधिकारी-योजना),आकाश दरेकर (उपशिक्षणाधिकारी),(जिल्हा प्रकल्प अधिकारी- मनपा),डॉ.अमोल बागुल (जिल्हा मतदारदूत) आदी उपस्थित होते. जिल्हा परिषद मुख्य कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या आवारात प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने मतदार जनजागृतीच्या शेकडो संकल्पना असलेला सुमारे ४००० स्केअर फुटांचा मतदार जागृती मंच उभारण्यात आलेला आहे.मतदार जनजागृतीचे शेकडो उपक्रम या कक्षामध्ये प्रस्तुत करण्यात आले असून मतदार जागृती मंचामार्फत घेण्यात आलेल्या मतदार प्रतिज्ञा, निवडणूक साक्षरता उपक्रम, वक्तृत्व स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा,विविध शाळांचे विद्यार्थी-शिक्षक -पालक यांच्या भेटी,पथनाट्य ,मतदार जनजागृतीपर गीते सादरीकरण,मतदानासाठी आवाहन आदी राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती फोटो,व्हिडिओ,डॉक्युमेंट, लिंक, रिल्स,वृत्तपत्र कात्रणे तसेच भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी - महाराष्ट्र,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आदी कार्यालयांच्या मतदान निवडणूक संदर्भातील पोस्ट स्वरूपात देण्यात आलेल्या वेबपेजचा क्यु आर कोड अथवा लिंक नागरिकांना ९००२१०९००३ या देशातील पहिल्या अहिल्यानगर जिल्हा स्वीप केअर व्हाट्सअप क्रमांकावरून प्राप्त होईल.डॉ. बागुल यांनी हे वेबपेज तयार केले आहे. उपक्रमासाठी जयश्री कार्ले,दत्तात्रय कवळे ,अशपाक शेख( सर्व मा.विस्तार अधिकारी-शिक्षण)महेंद्र आंधळे (सहाय्यक प्रशासन अधिकारी) व मंच सदस्य आदींचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले आहे .

# जिल्ह्यातील पहिला संघ या स्पर्धेतून दोन सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत होणार सहभागी

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनद्वारे आयोजित महाराष्ट्र स्टेट युथ लीग २०२४ साठी नगर शहरातील फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा १५ वर्षा खालील संघ लोणावळ्याला रवाना झाला. या स्पर्धेमधून महाराष्ट्रातील दोन सर्वोत्तम संघ राष्ट्रीय स्तरावरील ऑल इंडिया फुटबॉल फेडरेशन युथ लीग साठी पात्र होणार आहेत. प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या या स्पर्धेमध्ये जिल्ह्यातील पहिला संघ म्हणून सहभागी होण्याचा ऐतिहासिक मान फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमी संघास मिळाला आहे.फिरोदिया शिवाजीयन्सचा पहिला सामना शनिवारी (दि.२३ नोव्हेंबर) मुंबईच्या डिसूजा फुटबॉल कॅडमी विरोधात होणार आहे. स्पर्धे दरम्यान भारतातील नामांकित क्लब आणि अकॅडमीचे स्काऊटस खेळाडूंचे परीक्षण करणार आहेत. ही स्पर्धा लोणावळा येथील सिंहगड विद्यापीठाच्या (जि. पुणे) मैदानावर रंगणार आहे. पुढील तीन महिने ही स्पर्धा चालणार आहे. महाराष्ट्र स्टेट युथ लीगसाठी फक्त १० संघांना प्रवेश दिला जातो. यामध्ये फिरोदिया शिवाजीयन्सचा समावेश झालेला आहे. १३ वर्षा खालील फिरोदिया शिवाजीयन्सचा संघाचे प्रशिक्षण शिबिर सुरू असून, संघ युथ लीगमध्ये डिसेंबरच्या मध्यावर सहभागी होणार आहे. संघ व्यवस्थापक म्हणून मुख्य प्रशिक्षक जेव्हिअर स्वामी, व्यवस्थापक सचिन पाथरे, फिजिओ



डॉ. अर्शी बगदादी, सहाय्यक व्यवस्थापक महिमा पाथरे काम पाहत आहे.

शिवाजीयन्स स्पोर्ट्स क्लबचे अध्यक्ष मनोज वाळवेकर आणि शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाऊंडेशन ट्रस्टचे मुख्य विश्वस्त नरेंद्र फिरोदिया यांनी संघातील खेळाडूंना स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. पल्लवी सैंदाणे, अभिषेक सोनवणे, जोनाथन जोसेफ, राजेश अँथनी यांच्या परिश्रमामुळे फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा संघ या स्पर्धेत दाखल झाला आहे. हा ऐतिहासिक क्षण अहमदनगर जिल्हा फुटबॉल असोसिएशन, अहमदनगर महाविद्यालय, समर्पित खेळाडू आणि नगरकरांच्या पाठिंब्याशिवाय शक्य झाला नसता, अशी भावना नरेंद्र फिरोदिया यांनी व्यक्त केली. संघाला प्रायोजकत्व देणारे ग्रोथ एक्स व आय लव्ह नगर चे खेळाडूंनी आभार मानले.

**फिरोदिया शिवाजीयन्स अकॅडमीचा संघ पुढीलप्रमाणे:**–कर्णधार- माहीर गुंदेचा, उपकर्णधार- सौरभ खंडेलवाल, अंशुमन विधाते, आदर्श साबळे, अशोक चंद, अर्हम गुगळे, चिराग गोरे, दर्शन लवारे, फुरकान शेख, हर्षद सोनवणे, इंद्रजीत गायकवाड, जय मुथा, जोएल साठे, मयंक बजाज, नमन दिवाणी, ओम नितीन लोखंडे, ओम राजेंद्र लोखंडे, पवनराजे वाणी, राजवर्धन वीर, सोहेल खान, तक्ष लुणिया, तनीश पडागळे, वेदांत केळगंद्रे, वीरेंद्र वीर, यदुवर कोकरे.

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
वादळ वार्ता


## सौ.नमिता मुंदडा पुन्हा आमदार ;तेवीस उमेदवाराचे डीपॉझीट गुल

# मतदार संघातील विकास कामांची मिळाली पावती

## आमदार सासरे नंदकिशोर मुंदडा यांचे केज मतदार संघासाठी भरीव योगदान

**केज । प्रतिनिधी**

अटी तटीच्या सामान्यात अखेर आ नमिता मुंदडा एवढया २६८७ मतांनी विजय मुंदडा यांना ११७०८१ मते मिळाली तर पृथ्वीराज साठे यांना ११४३९४ मते मिळाली जनतेच्या सुखदु:खात आणि अडचणीला तत्परता दाखवणारे मुंदडा परिवार म्हणून गेली ३५ वर्ष कायम केज मतदार संघातील जनतेची सेवा केली असल्यामुळे मतदारसंघातील जनतेने पुन्हा एकदा विश्वास टाकून नमिताताई मुंदडा यांना आमदार पदी विराजमान केले जनतेच्या मनातील आमदार म्हणून केज मतदार संघातील जनतेने निवडले विकास कामांच्या आमदार म्हणून त्यांचा वारंवार नामउल्लेख केला जात असे केज मतदार संघातील रस्ते , नाली ,केज शहरातील स्वर्गीय लोकनेते गोपीनाथ मुंडे नाट्यगृह , शासकीय इमारती , उपजिल्हा रुग्णालयातील सोयी सुविधा असी कितीतरी विकास कामे केल्यांने आ. नमिता मुंदडा यांना केज शहरातील मतदार जनता कधीच विसरू शकणार नव्हती या विकास कन्येने केज मतदार संघात तसेच केज शहरात , नेकनुर शहारात , अंबाजोगाई शहरात अनेक विकास कामे केले आहेत त्याची पावती मतदारांनी दिली आहे आणि येणाऱ्या काळात सुद्धा भरपुर विकास केज मतदार संघाचा होईल असा विश्वास मतदारांना होता त्यामुळे मतदारांनी मतदान रूपी आशिर्वाद सौ मुंदडा यांना भरभरून दिला केज नगर पंचायतला कोट्यावधीचा निधी आणून शहरातील रस्ते आणि नाल्याची कामे शहरात अतिशय चांगल्या प्रकारची केली आहेत व या



रस्त्यावर चालताना रस्ते चांगले झाले असल्याचा अनुभव गावातील नागरिकांना तसेच वृद्धांना येत असून अतिशय उत्कृष्ठ दर्जाचे रस्ते केज शहरात फक्त आ. सौ. नमिता मुंदडा यांच्या माध्यमातूनच झाले. असल्यामुळे पुन्हा एकदा अभ्यासू आमदार म्हणून संधी दिली आहे विविध विकास कामातून आपल्या आमदारकीची छाप नमिता मुंदडा यांनी केज मतदार संघात टाकली होती व पुन्हा ही छाप कायम राहील आपले स्वतंत्र अस्तित्व या केज मतदार संघात निर्माण करून नमिताताई यांनी मायबाप जनतेच्या मनात आपला ठसा उमटवला व तो कायम ठेवला आहे. त्यामुळे सौ.नमिता मुंदडा या विकास कन्येला पुन्हा केज मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने त्यांना भरघोस मतांनी निवडून दिले आहे जनता ही फार आभ्यासू आहे मत विकासाला दयाचे की, पाच वर्षात फक्त निवडणुकी पुरते मतदारा सामोर जायचे हे जनतेला सांगायची गरज नाही कारण विकास काय असतो हे आ नमिता मुंदडा यांनी केज मतदार संघाला दाखुन दिले होते त्यामुळे मतदारांनी त्यांना केज मतदार संघाचा कायापालट करण्यासाठी व उर्वरित राहिलेला विकास पूर्ण करण्यासाठी पुन्हा एकदा आमदार पदी विराजमान केले आहे.

## ग्रामीण भागातील डफली वरील दवंडी हद्दपार

**विहामांडवा । प्रतिनिधी**

मागील अनेक वर्षांपासून शासकीय असो की निमशासकीय कुठलाही कार्यक्रम असल्यास डफडी वाजवत 'ऐका हो ऐका' अशा पहाडी आवाजात दवंडी देऊन ग्रामस्थांना सुचना देण्याची परंपरा होती. मात्र आता काळानुसार दवंडीची प्रथा हद्दपार झाली आहे. दवंडीची जागा आता मोबाईल वरील व्हाट्स ॲप गृप व गृप मॅसेज, फार तर ध्वनीक्षेपका वरून निमंत्रण दिले जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात 'ऐका हो ऐका' असा दवंडीचा आवाज ऐकावयास मिळत नाही. काळाच्या ओघात दवंडीचा पहाडी आवाज आता लुप्त झाला आहे.

पैठण तालुक्यातील बहुतांश ग्रामपंचायती द्वारे पुर्वीच्या काळात शासनाची असो की ग्रामसभेची माहिती दवंडी देऊन दिली जात असायची. ग्रामपंचायती मधील कुठलाही व गावातील शासकीय कार्यक्रमाची सुचना दवंडी देऊनच कळविली जायची. त्यामुळे लोकांना घरपोच माहिती मिळायची. दवंडीचा आवाज आला की काहीतरी कार्यक्रम आहे. हे निश्चित व्हायचे किंवा ती पुन्हा पुन्हा ऐकायची एक उत्सुकता लागलेली असायची. तसेच योजनेची माहिती, फॉर्म भरण्याची सुचना, ग्रामसभा असल्याचे समजत असे. परंतु आता आधुनिक काळात हा प्रकार ग्रामीण भागात जवळपास बंद झाला आहे. आता कुठलाही कार्यक्रम, शासकीय योजनांची माहिती, ग्रामसभेची सुचनाही सोशल मीडियाद्वारे ग्रुपवर टाकल्या जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागात ह्यऐका हो ऐकाह्व हा दवंडीचा खुणावणारा आवाज लुप्त झाला आहे. पुर्वी गावातील ग्रामसभेची सूचना दवंडीतुन करायची. त्यामुळेदवंडी देणाऱ्या. भोवती मोठी गर्दी असायची आणि वादळी चर्चा व्हायची. तसेच काही ग्रामसभेला हजर नसल्यास संबंधित व्यक्ती उपस्थित ग्रामसभेत काय झाले, याची माहिती घ्यायचे. परंतु आता सोशल मीडियावर किंवा फलकावर ग्रामसभेच्या सुचना देऊ लागल्याने अनेकांना ग्रामसभेची माहिती पोहोचताना दिसत नाही. ग्रामसभेला महत्त्व प्राप्त झाले तरी लोकांच्या अनुपस्थिती मुळे चर्चेविना ग्रामीण भागात ग्रामसभा होत आहेत. तर काही ग्रामपंचायतीमध्ये केवळ कागदोपत्रीच ग्रामसभेची औपचारिकता पुर्ण केली जाते. ग्रामीण भागातील दवंडीचा प्रकार हद्दपार झालेला दिसतो. दवंडीतुन प्रसारीत होणारी माहिती वेगाने लोकांना समजायची. परंतु सोशल मीडीया मधुन मोजक्या लोकापर्यंतच पोहोचताना दिसत आहे. पुर्वी विशेष म्हणजे या दवंडीची चर्चा गावभर व्हायची. त्यामुळे कोणी दवंडी ऐकली नाही तर संदेश मात्र मिळायचाच. आता प्रत्येकाकडे मोबाईल असला तरी त्यातील संदेश वाचण्याची वेळ नसल्याचे चित्र दिसत आहे. ग्रामीण भागात 'ऐका हो ऐका' असे म्हणत शासकीय माहिती, जनजागृती मोहिमेबाबत दवंडी दिली जायची. त्यामुळे ही दवंडी लक्षपूर्वक ऐकायचे. काही प्रश्न असल्यास उपस्थित करायचे. परंतु आता दवंडीचा आवाज आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात कायमचा बंद झाला आहे.

## आ.राजेश पवारांच्या छप्परफाड विजयाने मतदार संघात जल्लोष

**नायगाव । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत भाजप उमेदवार आ. राजेश पवार यांच्या विजयाचा जल्लोष नायगावमध्ये करण्यात येत असून. आ. पवार यांनी घडवलेली काशी विश्वनाथ यात्रा, लाडकी बहीण योजना व जरांगे समर्थकांनी दिलेल्या भरभरून मतदानामुळे छप्परफाड विजय मिळाला आहे. राजेश पवार यांना १ लाख २९ हजार मते मिळाली तर डॉ. मिनल खतगावकर यांना ८१ हजार मते मिळाली.

नायगाव विधानसभा मतदार संघात तिरंगी सामना झाला. यात महायुतीचे आ. राजेश पवार हे भाजपकडून, महाविकी आघाडीकडून डॉ. मिनल खतगावकर काँग्रेसची उमेदवारी मिळाली होती तर वंचित बहूजन आघाडीकडून डॉ. माधव विभूते हे निवडणुकीच्या मैदानात होते. तीनही उमेदवारांनी प्रचाराचा अनेक मुद्दे उपस्थित केले. विकास कामातील टक्केवारी, त्याचबरोबर गोदावरी मनार सारखा कारखाना मोडीत काढला तसेच डॉ. मिनल खतगावकर या बाहेरच्या असल्याचाही आरोप झाला. तिन्ही उमेदवारांनी एकदुसऱ्यावर आरोपांच्या फैरी झाडल्या. मागच्या पंधरा दिवसांत उडालेल्या प्रचाराच्या धुरळ्यामुळे नायगाव




विधानसभा निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली होती आणि काटे की टक्कर होणार असे वाटत असतानाच मतदार संघात निर्माण झालेली चुरस ही फोल ठरल्याचे दिसून येत आहे. आ. राजेश पवार यांनी मागच्या पाच वर्षात मतदार संघातील रस्ते सुधारणा करण्याच्या कामावर भर दिली होती. मतदार संघातील प्रमुख रस्ते करण्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर त्यांनी गावोगावी मोठ्या प्रमाणात आरोग्य शिबीरे घेतली, रुग्णांना चश्मे घरपोच दिले. मागच्या दोन वर्षापासून त्यांनी तिर्थयात्रा सुरु केली होती. त्यात त्यांची काशी यात्रा लक्षवेधी ठरली मतदार संघातील हजारो नागरिकांनी काशी यात्रेत विश्वनाथाचे दर्शन घेतले आणि काशीला गेलेले मतदार हे प्रामाणिक असतात अशी चर्चा होत होती. आ. राजेश पवार व त्यांच्या पत्नी सौ. पुनम पवार यांनी सतत मतदार संघात संपर्क ठेवून मतदारांच्या अडचणी समजून तर घेत होत्याच पण आरोग्य शिबिरात आयोजित करुन गोरगरीब नागरिकांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देत होत्या या कामाचा तर आ. राजेश पवार यांना फायदा तर झालाच पण मराठा समाजातील तरुणही आ.पवार यांच्या संपर्कात होते त्यामुळे मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणावरुन रान उठवले असले तरी मतदार संघातील मराठा समाज मात्र भाजपला भरभरून मते देतांना दिसला. विशेषतः राज्य शासनाच्या लाडकी बहिण योजनेमुळे महिलांनीही भाजपच्या पारड्यात आपले वजन टाकले. झालेल्या मतदानाची मतमोजणी शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तिर्थ विद्यापीठात झाली. मतमोजणीच्या सुरुवातीपासूनच आघाडी घेणाऱ्या राजेश पवार यांची शेवटच्या राउंडपर्यंत आघाडी कायम होती. त्यामुळे आ. राजेश पवार हे दुसऱ्यांदा आमदार झाले आहेत. त्यांच्या विजयाचा जल्लोष करण्यात येत असून ढोल ताशे, फटाक्यांची अतिषबाजी करण्यात येत आहे.

# विकासाच्या मुद्द्यावर मी ही लढाई जिंकलो-आ.प्रशांत बंब

## गंगापुर खुलताबाद विधानभा प्रशांत बंब यांची चौथ्यांदा पकड

**गंगापुर । प्रा संजय तुपे**

गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघांमध्ये अत्यंत चुरशीची

लढत बघायला मिळाली यामध्ये आमदार प्रशांत बंब यांनी ५५०९ एवढ्या मतांनी विजयी झाले आहेत. संपूर्ण मराठवाड्याचे लक्ष लागलेल्या गंगापूर खुलताबाद विधानसभेच्या निवडणुकीत कोण विजयी होणार याविषयी तर्कवितर्क लावले जात होते. सकाळी आठ वाजता प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाल्यानंतर आठव्या फेरीपर्यंत खुलताबाद मधून पदवीधरचे आमदार सतीश चव्हाण यांनी ४ हजाराची आघाडी घेतली होती. परंतु गंगापूर मतदार संघ चालू होतात आमदार प्रशांत बंब यांनी २७ व्या फेरीपर्यंत ५५०९ एवढी आघाडी घेऊन गंगापुर खुलताबाद विधानसभा मतदार संघात विजय संपादन केले. याप्रसंगी कार्यकत्र्यांनी एकच जल्लोष साजरा केला. प्रशांत बंब हे भाजपचे औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील गंगापूर विधानसभा मतदारसंघातील आमदार आहेत. तरुण तडफदार, आक्रमक आणि अभ्यासू आमदार म्हणून त्यांची ख्याती आहे. भाजपचे गंगापूर विधानसभा आमदार आहेत. तरुण तडफदार, अभ्यासू आमदार म्हणून



त्यांची घरात कोणतीही राजकीय राजकारणात येऊन सलग चौथ्यांदा निवडणूक बंब यांनी जिंकली.

स्वत:ला सिद्ध केलं. हे कसं घेतलेला हा आढावा. प्रशांत बंब राजकीय पाश्र्वभूमी नाही. त्यांनी राजकारणात प्रवेश केला राजकारणात आल्यावर त्यांना आणि त्यांचं नेतृत्वही तयार लासूर स्टेशन ग्रामपंचायत सरपंच, जिल्हा परिषद सदस्य जिल्हा परिषदेच्या अर्थ व सभापतीपद आदी पदे त्यांनी भूषविली आहेत. स्थानिक प्रशासनाचा अनुभव असल्यानेच राज्य स्तरावर काम करताना त्याचा त्यांना फायदा होतो.२००९, ३०१४ आणि २०१९ व २०२४ मध्ये ते सलग चार वेळा विधानसभेवर निवडून आले आहेत. मतदारसंघातील नागरिकांशी सातत्याने असलेला संपर्क, कार्यकत्र्यांची मजबूत फळी उभारण्यात आलेलं यश, सर्वांच्या सुखादुखात धावून जाणे आणि मनमिळावूपणा यामुळे ते आपला मतदारसंघ राखू शकले आहेत. हेच त्यांच्या यशाचं गमक आहे. विशेष म्हणजे गंगापूर विधानसभा मतदारसंघात हॅट्रीक साधण्याचा विक्रमही त्यांनी केला.आणि आता चौथ्यांचा निवडून आलेले आहेत.प्रशांत बंब हे मतदारसंघातील आक्रमक आणि ख्याती आहे. पाश्र्वभूमी नसताना विधानसभेची तसेच राजकारणात घडलं? याचाच यांना कोणतीही एमबीए झाल्यानंतर . विशेष म्हणजे यश मिळत गेले झालं. २००२ मध्ये सदस्य, उपसरपंच, , २००५ मध्ये बांधकाम समितीचे प्रशांत बंब सलग दुसऱ्यांदा निवडून आल्यानंतर २०१४ मध्ये राज्यातील फडणवीस सरकारमध्ये त्यांचा समावेश होईल असं बाटत्त होतं. मात्र, बराच कालावधीनंतर राज्यात भाजपची सत्ता आली होती. त्यामुळे मंत्रिमंडळात नव्या जुन्या नेत्यांची मोट बांधणं आवगयक होतं. त्यातच शिवसेना मित्रपक्ष असल्याने सेनेकडे काही मंत्रिपदं गेली. त्यामुळे मंत्रिपदाच्या वाटपाची तारेवरची कसरत देवेंद्र फडणवीस यांना करावी लागली. त्यामुळे बंब यांना संधी मिळू शकली नाही. विशेष म्हणजे फडणवीसांची जवळीक असूनही त्यांना मंत्रिमंडळात संधी मिळू शकली नाही. मात्र, तिसऱ्यांदा निवडून आल्यानंतर बंब आता मंत्री होणारच असं वाटत

होतं. परंतु, राज्यात महाविकास आघाडीचं सरकार आलं. भाजपला विरोधात जाऊन बसावं लागल्याने यावेळीही बंब यांचं मंत्रिपदाचं स्वप्नं भंगलं. आता गंगापूर तालुक्याला मंत्रीपद येणार याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.२०१९ मधील गंगापूर विधानसभा निवडणूक तशी बंब यांच्यासाठी सोपी नव्हती. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या दिग्गज नेत्यांचं त्यांच्यासमोर आव्हान होतं. मात्र, त्यांनी या निवडणुकीत बाजी मारून गंगापूर आणि खुलताबाद तालुक्यात आपलेच बर्चस्व असल्याचं त्यांनी दाखवून दिलं आहे. मतांचं ध्रुवीकरण करून बंब यांना शह देण्याचा प्रयत्नही यावेळी झाला. पण बंब त्याला बधले नाही. त्यांनी विरोधकांचे सर्व प्रयत्न फोल ठरवले. शिवसेनेतून काँग्रेसमध्ये येऊन निवडणूक लढवणाऱ्या संतोष माने यांचा त्यांनी मोठा पराभव केला. आणि २०२४ मध्ये पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांचा पराभव केला.बंब हे आक्रमक तसेच अभ्यासू आमदारही आहेत. मराठवाड्याच्या हक्काच्या समन्यायी पाण्याचा प्रश्न, असो की मतदारसंघातील विकासाचा प्रश्न त्यांनी सातत्याने विधानसभा आणि विधानसभेबाहेर त्यावर आवाज उठवला आहे. जायकवाडीच्या पाण्यासाठी न्यायालयीन लढाई असो की गंगापूर साखर कारखाना खाजगी उद्योजकांच्या घशातून काढण्यासाठी केलेले प्रयत्न असो या कामांमुळे ते नेहमीच चर्चेत राहिले आहेत. कोणत्याही विषयावर बोलण्यापूर्वी त्या विषयाची पुरेपूर तयारी करूनच ते विधानसभेत येतात. प्रत्येक मुद्दा पटवून देताना ते अनेकदा आक्रमक होतानाही दिसतात.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077